सन २०२६ मधील दुष्काळ परिस्थितीत वन विभागाकडून विविध उपाययोजना करणेबाबत

महाराष्ट्र शासन

वन विभाग

शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०/२०२६/प्र.क्र.२१७/फ-६

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- ०४ नोव्हेंबर, २०२६

संदर्भ :- पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्र.DAHD-14034/54/ 2026-DAHD-AH4 (E-1869528) दिनांक ३०.१०.२०२६

प्रस्तावना :-

राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यानुषंगाने वन विभागाकडून चारा उपलब्ध करुन देण्याकरीता वन जमिनीत असलेला चारा गवत याची त्वरीत कापणी, साठवण व पशुपालन यांना उपलब्ध होण्याविषयी कार्यवाही करणे. वनविभागाकडे असलेल्या जमिनीमध्ये ज्या ठिकाणी जमीन व सिंचन व्यवस्था आहे अशी जमीन चारा उत्पादनासाठी उपलब्ध करुन देणे वन्यजीव संरक्षण तसेच मानव वन्यजीव संघर्षातून होणारी हानी रोखणे याकरिता उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१) राज्यातील दुष्काळ परिस्थितीमध्ये वन विभागाकडून चारा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने यापुढे शासनाचे निर्देश होईपर्यत वनविभागाच्या अखत्यारीत क्षेत्रातील गवत, कुरण (चारा) याचे लिलावाची कोणतीही कार्यवाही करु नये.

२) वन विभागाकडे उपलब्ध असलेल्या चाऱ्याच्या वापराबाबत कोणतीही कार्यवाही करण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांशी विचार विनिमय करावा.

३) वन विभागाच्या क्षेत्रावरील चारा कापणी-बांधणी व वाहतुक इत्यादीसाठी लागणारा निधी जिल्हा नियोजन समितीकडून उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक कार्यवाही करावी.

४) वनवणवा रोखण्याकरीता दरवर्षी जाळपट्टे घेण्यात येतात अशा ठिकाणी दुष्काळ परिस्थितीत प्रत्यक्ष जाळपट्टे करण्यापुर्वी अशा जाळ पट्टयातील गवताची कापणी करावी. तसेच दुष्काळी परिस्थितीमुळे वाढलेली जोखीम पाहता जास्तीच्या आग प्रतिबंधक पट्टयांची आवश्यकता आहे का, हे तपासावे.

५) वन विभागाने वन जमिनीत उपलब्ध असलेला चारा गवताची/त्वरीत कापणी करणे, साठवणे व आवश्यकतेनुसार पशुपालकांना उपलब्ध करुन देण्यात यावी. याकरीता शेतकरी उत्पादक संस्था व कंपन्यांची मदत घेण्यात यावी. अथवा जिल्हाधिकारी सुचवतील त्या संस्थामार्फत ही कामे करावीत.

६) वन विभागाकडे उपलब्ध असलेल्या जमिनी जिथे सिंचन व्यवस्था असेल अशा जमिनीवर चारा उत्पादनासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

७) वन्यजीवांच्या संरक्षणासाठी चारा व पाण्याची उपलब्धता याकरीता फायर ब्लोअर खरेदी करणे, अग्निरेषा, वाहन भाडयाने घेणे, नवीन बोअरवेल तयार करणे, मातीचे बंधारे तयार करणे, पानस्थळांचे परिक्षण इ. उपाययोजना करण्यात याव्यात.

८) राज्यातील दुष्काळच्या पार्श्वभूमीवर मानव वन्यजीव संघर्षामुळे उद्भवणारी प्रकरणे प्राधान्याने निकाली व कोणत्याही परिस्थितीत ४ आठवडयात निकाली काढण्यात यावीत.

९) दुष्काळावर मात करण्यासाठी वनविकास महामंडळाकडून वनतळी, वॉटर होल्स, टँकर्स, सोलार पंप, जनावरांकरीता कृत्रिम पाणवठे इ. उपाययोजना करण्यात याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०२६११०४१६०६४३२९४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PRAVIN RAJARAM MUNDHE
Date: 2026.11.04 16:07:44 +05'30'

(प्रविण मुंढे)

उप सचिव, वन विभाग

प्रत :-

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
५) अपर मुख्य सचिव (महसूल)
६) अपर मुख्य सचिव (वित्त)
७) अपर मुख्य सचिव (वने)
८) प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन)
९) सचिव (कृषी)
१०) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
११) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१२) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४) उप सचिव (वने)/मुख्य वनसंरक्षक, मंत्रालय,
१५) कार्यासन फ-१, कार्यासन फ-५ वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) निवडनस्ती (फ-६)